# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - शब्दतरंग
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. वीणा विजय रणदिवे

---

अनुभवांचे विश्व
वेदनांची संहिता,
अबोल भावना या
शब्दांची पूर्तता.

अंतरंगा डोकावतो
शब्दांचा कवडसा,
व्यापून उरतो हा
लेखणीचा ठसा.

उजळून मन हे
स्वच्छ प्रतिबिंब,
शब्दांनी आरेखित
अव्यक्त तरंग.

ताल गवसता शब्दांना
सूर नाद जरासा,
मनमानसी उमलते
काव्य अभिलाषा.

संवाद शब्दांशी
गूज या हृदयीचे,
हरपून भान जाते
विश्व हे कवितेचे....

Anahat Music Therapy